• वर्ष : ०३ • अंक : ३४३ • पुणे • गुरुवार, दि. ०३ सप्टेंबर २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक





वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम 3



खो-खो चॅम्पियनशिपमुळे भारतातील खो-खो क्रांतीला बळ 4

## ठळक बातम्या

### रस्त्याच्या कामाची निविदा अखेर रद्द

पुणे (आरंभ पर्व) : चांदणी चौक ते भुगाव या ६० मीटर रुंदीच्या रस्त्यासह उड्डाणपूल आणि ग्रेड सेपरेटरच्या कामासाठी काढण्यात आलेली निविदा ही पुर्वगणनपत्रकापेक्षा अधिक खर्चाची काढण्यात आली होती. त्यामुळे ही निविदा रद्द करण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे. भुगावकडून चांदणी चौकात येणाऱ्या रस्त्यावर उड्डाणपूल उभारला जाणार आहे. रस्त्याची लांबी सुमारे दोन किलोमीटर असून, या परिसरातील खासगी मालकीची जमीन, वन विभागाच्या जमिनीची उपलब्धता, माती परीक्षण, बोर लॉग, सॉइल इन्व्हेस्टिगेशन आणि सात दिवसांचे २४ तास वाहतूक सर्वेक्षण झाले नाही. उड्डाणपूल व ग्रेड सेपरेटर उभारण्यापूर्वी आवश्यक असलेला फिजिबिलिटी रिपोर्टही मान्यताप्राप्त स्वतंत्र संस्थेकडून तयार करण्यात आलेला नाही.

### पुणेकरांना पाहता येणार कामाचा माणूस

पुणे (आरंभ पर्व) : जनतेच्या अडचणी ऐकून त्या सोडविण्यासाठी धावून जाणारा 'कामाचा माणूस' म्हणून ओळखले जाणारे दिवंगत अजित पवार यांची आठवण यंदाच्या गणेशोत्सवात पुन्हा जागवली जाणार आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाने अवघा महाराष्ट्र हळहळला. आजही ते आपल्यातच आहेत, अशी भावना कार्यकर्त्यांमध्ये आहे. यंदाच्या गणेशोत्सवात लाडक्या दादांचे दर्शन घडणार असून, 'कामाचा माणूस' पुन्हा कार्यकर्त्यांसह पुणेकरांना अनुभवायला मिळणार आहे. 'अजित दादा'च्या दरबारात जनतेची गाऱ्हाणी असा अनोखा हलता देखावा यंदा गणेशोत्सवाचे आकर्षण ठरणार आहे. गणपती बाप्पाच्या आगमनाची चाहूल लागली असून, गणेशोत्सवासाठी विविध मंडळांची लगबग सुरू झाली आहे.

# यवत पोलिसांची दमदार कामगिरी

## मोटारसायकल चोरी करणारा आरोपी जेरबंद : १ लाख १० हजार रुपयांच्या ७ मोटारसायकली जप्त



**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

बोरीपार्धी (ता. दौंड) येथील केडगाव रेल्वे स्थानकासमोरील मोकळ्या जागेतून मोटारसायकल चोरी करणाऱ्या आरोपीला यवत पोलिसांनी जेरबंद केले आहे. पोलिसांनी आरोपीकडून चोरीच्या एकूण सात मोटारसायकली जप्त केल्या असून, त्यांची अंदाजे किंमत १ लाख १० हजार रुपये आहे. ९ जुलै २०२६ रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास केडगाव रेल्वे स्टेशनसमोरील मोकळ्या जागेतून काळ्या रंगाची हिरो कंपनीची स्प्लेंडर आय स्मार्ट मोटारसायकल चोरीला गेली होती. याप्रकरणी यवत पोलीस ठाण्यात गु.र.नं. ६९९/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचा तपास करण्यासाठी यवत पोलिसांनी विशेष तपास पथक तयार केले. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तसेच गोपनीय बातमीदारांच्या माध्यमातून अज्ञात आरोपीचा शोध सुरू केला. तपासादरम्यान मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यात बालाजी पांडुरंग लोखंडे (रा. मुरुड, ता. लातूर, जि. लातूर) याचा सहभाग असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी लोखंडे याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने मोटारसायकल चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर त्याला अटक करण्यात आली. पुढील तपासादरम्यान आरोपीकडून यवत पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यातील चोरीची मोटारसायकल तसेच वेगवेगळ्या कंपन्यांच्या आणखी सहा मोटारसायकली, अशा एकूण सात मोटारसायकली जप्त करण्यात आल्या.

ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार आणि उपविभागीय पोलीस अधिकारी बापुराव दडस यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कारवाईत यवत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष तासगावकर, पोलीस उपनिरीक्षक मारोती मेतलवाड, पोलीस हवालदार संदीप देवकर, रॉकी देवकाते, अमोल काळे, महेंद्र चांदणे, तसेच पोलीस कर्मचारी धिरज जाधव, प्रतिक जगताप, अमोल भुजबळ, सचिन गुंड, मारुती बाराते, दिनेश लोणकर आणि विनित कुऱ्हाडे यांनी सहभाग घेतला.

## सत्ताधारी भाजपविरोधात घोषणाबाजी, मत न मांडताच राष्ट्रवादीचा सभात्याग

**पिंपरी (दै. आरंभ पर्व)**

महापालिकेची सर्वसाधारण सभा अनधिकृत आहे, असा आरोप करीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) च्या पदाधिकाऱ्यांनी बुधवारी प्रशासन आणि भाजपविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. पोस्टरबाजी केली. त्यावर सभा अधिकृत असल्याचा खुलासा केल्यानंतर कोणत्याही चर्चेत सहभागी न होता, राष्ट्रवादीने सभात्याग केला. सभेत मेट्रो, वाहनतळ, स्वच्छतागृह अशा महत्त्वाच्या धोरणांसह २१ विषयांना मंजुरी देण्यात आली. सभा महापौर रवी लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी दोन वाजता सुरू झाली. कामकाज सुरू होण्यापूर्वीच सत्कार समारंभ होता. त्यावेळी राष्ट्रवादीने गोंधळ घालण्यास सुरुवात केली. निषेधाच्या घोषणा देत सभा घेण्यास विरोध केला. काही नगरसेवकांनी हातात फलकही घेतले होते. त्यावर 'खाली बसा, असे सांगत कामकाज सुरू करा', असे आदेश महापौरांनी दिले. माजी महापौर तथा राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष योगेश बहल यांनी सभेस आक्षेप घेतला. बहल म्हणाले, महापौर आणि स्थायी समितीचे अध्यक्ष तरुण आहेत. कामे व्हावीत, अशी त्यांची तळमळ आहे. राज्यात आणि केंद्रात आपण एकत्र आहोत. काम करण्यास आम्ही सोबत आहोत. मात्र, नियमबाह्य चुकीची कामे होऊ देणार नाही. सात दिवसांची नोटीस न देता ही सभा आयोजित करण्यात आल्याने ही सभा बेकायदेशीर आहे. त्याबाबत नोटीस दिली आहे. त्याचे उत्तर मिळालेले नाही. स्थायी समितीला सर्वसाधारण सभा घेण्याचा अधिकार नाही. ते केवळ महापौरांना विनंती करू शकतात.



## नानगावात पाच वर्षीय चिमुकलीची हत्या; नातेवाईक पोलिसांच्या ताब्यात

**केडगाव (दै. आरंभ पर्व)**

नानगाव (ता. दौंड) येथे पाच वर्षीय चिमुकलीची हत्या झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. सोमवारी (दि. ३१) घरातून बेपत्ता झालेल्या चिमुकलीचा मृतदेह मंगळवारी रात्री गावापासून दूर असलेल्या निर्जन विहिरीत आढळून आला. याप्रकरणी गोरख रामसिंग वसावे (वय ३०, रा. राणीपूर, जि. नंदुरबार) याला यवत पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. चिमुकली बेपत्ता झाल्यानंतर कुटुंबीयांनी दिवसभर शोध घेतला. तपासादरम्यान आरोपी चिमुकलीला सोबत घेऊन जात असल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये आढळले. चौकशीत त्याने मृतदेह सुरेंद्र गिरमे यांच्या मालकीच्या विहिरीत फेकल्याचे सांगितले. पाण्याने भरलेल्या विहिरीतून मंगळवारी रात्री साडेदहा वाजता मृतदेह बाहेर काढण्यात आला. पोलिसांच्या माहितीनुसार, चिमुकलीच्या आईशी झालेल्या भांडणाच्या रागातून हत्या केल्याची कबुली आरोपीने दिली आहे. आरोपी नुकताच नंदुरबारहून आई-वडिलांसह ऊसतोड कामासाठी नानगाव येथे आला होता. या प्रकरणाचा तपास सुरू असून शवविच्छेदन व न्यायवैद्यक प्रयोगशाळेच्या अहवालानंतर घटनेतील अधिक बाबी स्पष्ट होतील. आरोपीला दि. ५ पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. चिमुकलीचा मृतदेह आढळलेली विहीर गावापासून दूर व निर्जन ठिकाणी आहे. घटना समजताच परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली. पोलिसांनी हस्तक्षेप करून गर्दी हटवली.



# सारसबाग बस स्थानकाची दुरवस्था

## महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सारसबाग येथील विश्व हॉटेलसमोरील बस स्थानकाची दुरवस्था झाली असून, खानापूर व सिंहगडच्या दिशेने प्रवास करणाऱ्या नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. बस स्थानकात स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा नसल्याने प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. तसेच, येथील स्वच्छतागृह वापरण्यायोग्य नसून परिसरात दुर्गंधी पसरत असल्याची तक्रार प्रवाशांनी केली आहे.

स्वच्छतागृहाची नियमित स्वच्छता होत नसल्याने प्रवाशांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. याशिवाय, बस स्थानकात पुरेशी प्रकाश व्यवस्था नसल्यामुळे रात्रीच्या वेळी महिला व मुलींना असुरक्षित वाटत असल्याचे सांगण्यात आले. अंधाराचा फायदा घेऊन काही व्यक्ती येथे दारू पित बसत असल्याने महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अधिक गंभीर झाला आहे. त्यामुळे बस स्थानकात तातडीने पुरेशी प्रकाश व्यवस्था करावी, स्वच्छतागृहाची नियमित स्वच्छता करावी आणि स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. रात्रीच्या वेळी महिला व मुलींच्या सुरक्षिततेसाठी बस स्थानकात सुरक्षा रक्षक नेमावेत, अशी मागणी शिवसेनेचे माजी पंचायत समिती सदस्य नितीन वाघ, सौरभ मोकाशी, आकाश पायगुडे, रामदास गायकवाड आणि पप्पू गायकवाड यांनी पुणे महानगर परिवहन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक महेश आव्हाड यांच्याकडे केली आहे. "महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देऊन या समस्यांवर तातडीने उपाययोजना कराव्यात," अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# महिला नेतृत्वाला बळ : देशसेवा फाऊंडेशनची कार्यकारिणी जाहीर

### समाजसेवेचा विस्तार करण्यासाठी पदाधिकाऱ्यांची मजबूत टीम सज्ज : नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना शपथ व नियुक्तीपत्र प्रदान; सर्व नियुक्त्या सर्वानुमते



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

समाजसेवेच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या प्रश्नांना न्याय देण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या देशसेवा फाऊंडेशनच्या नूतन कार्यकारिणीची घोषणा मोठ्या उत्साहात करण्यात आली. यावेळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना त्यांच्या पदाची तसेच संस्थेच्या कामकाजातील गोपनीयतेची शपथ देण्यात आली. फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष श्री. नरेंद्र पारखे आणि सचिव श्री. अमोल हांडे यांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. देशसेवा फाऊंडेशनच्या कार्यकारिणीत नरेंद्र पारखे (संस्थापक अध्यक्ष), शारदा शेळके, (उप अध्यक्षा), अमोल हांडे (सचिव), संजय कैकाडे (खजिनदार), पूर्वा हांडे (सभासद व पुणे जिल्हा महिला अध्यक्ष), हर्षा कैकाडे (सभासद व पुणे शहर महिला उपाध्यक्ष), ओंकार पारखे (सभासद व पर्वती मतदार संघ अध्यक्ष), राजेश माने (पुणे शहर अध्यक्ष), सुरेखा मते (पुणे शहर महिला अध्यक्षा), अस्मिता पारखे (महिला समन्वयक), भारत शाह (महाराष्ट्र समन्वयक), प्रतिक गंगणे (खडकवासला विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष), नीलम कुलकर्णी (शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघ अध्यक्षा), वंदना कोर्टीकर (कोथरूड विधानसभा मतदार संघ अध्यक्षा) मंजुषा आवळकंठे (पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघ अध्यक्षा), ज्ञानेश्वर शिंदे (वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष), संगीता शिंदे (मावळ विधानसभा मतदारसंघ अध्यक्षा आणि शिवानी आवळकंठे (प्रसिद्धी माध्यम प्रमुख) महाराष्ट्र राज्य यांची नियुक्ती करण्यात आली. या सर्व नियुक्त्या सर्वानुमते करण्यात आल्याचे संस्थापक अध्यक्ष श्री. नरेंद्र पारखे यांनी जाहीर केले. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी फाऊंडेशनच्या ध्येयधोरणांनुसार समाजहितासाठी प्रामाणिकपणे आणि जबाबदारीने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. आगामी काळात देशसेवा फाऊंडेशनच्या माध्यमातून सामाजिक, महिला सक्षमीकरण, युवक, गरजू नागरिक तसेच विविध जनहिताच्या विषयांवर व्यापक उपक्रम राबविण्यात येणार असून, पुण्यासह महाराष्ट्रातील विविध भागांत फाऊंडेशनचे सामाजिक कार्य अधिक प्रभावीपणे पोहोचविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

**यावेळी बोलताना संस्थापक अध्यक्ष श्री. नरेंद्र पारखे म्हणाले**, पद ही प्रतिष्ठा नसून समाजसेवेची जबाबदारी, "देशसेवा फाऊंडेशनमध्ये मिळालेले प्रत्येक पद हे प्रतिष्ठेचे नव्हे, तर समाजसेवेची मोठी जबाबदारी आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत मदत आणि न्याय पोहोचविणे, गरजूंच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न करणे आणि समाजहिताचे उपक्रम प्रभावीपणे राबविणे हे फाऊंडेशनचे प्रमुख उद्दिष्ट आहे. नवनियुक्त प्रत्येक पदाधिकारी हा फाऊंडेशनचा चेहरा आणि समाजाशी जोडणारा दुवा आहे. त्यामुळे प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि सेवाभाव या तीन मूल्यांच्या आधारावर सर्वांनी काम करावे."

**"फाऊंडेशनचे सचिव श्री. अमोल हांडे म्हणाले,** एकजुटीने काम केल्यास समाजपरिवर्तन शक्य" "देशसेवा फाऊंडेशनची ताकद ही त्याच्या पदाधिकाऱ्यांमध्ये आणि कार्यकर्त्यांच्या एकजुटीत आहे. आजची कार्यकारिणी ही समाजातील विविध घटकांना एकत्र घेऊन काम करण्याच्या व्यापक दृष्टिकोनातून तयार करण्यात आली आहे. प्रत्येक पदाधिकाऱ्याने आपल्या जबाबदारीकडे केवळ पद म्हणून न पाहता समाजाप्रती असलेले कर्तव्य म्हणून पाहावे. संघटित प्रयत्न, योग्य नियोजन आणि सातत्यपूर्ण जनसेवा यांच्या माध्यमातून फाऊंडेशनच्या कार्याचा विस्तार महाराष्ट्रभर करण्याचा आमचा संकल्प आहे."

सुवर्णसंधी!
InDesign ऑपरेटरची गरज आहे!
मासिक पगार
आकर्षक पगार दिला जाईल




✓ अनुभवी आणि कल्पक ऑपरेटर हवा
✓ मासिक पगार (पात्रतेनुसार)
✓ इन-डिझाइन सॉफ्टवेअरचे उत्तम ज्ञान
✓ कामाचे लवचिक तास
संपर्क : ७२७६३१४१४२/८६६७८६५७०२

## थोडक्यात पण महत्वाचे



## संस्थाही आपलीच कर्मभूमी म्हणून काम केल्यास नक्कीच प्रगती होते

- शैलेंद्रजी जगताप यांचे प्रतिपादन

पुणे (आरंभ पर्व) : पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड मधून 32 वर्षाची विना अपघात सेवा पूर्ण करून स्वारगेट येथे चालक या पदावर काम करत असलेले श्री दत्तात्रेय मोडक आज सेवानिवृत्त होत आहेत त्यांचा सेवा निवृत्ती सन्मान सोहळा कार्यक्रम ग्रँड पुरंदर बॅक्वेट हॉल भिवरी येथे नटराज बस स्थानक सर्व कर्मचारी यांच्या मार्फत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख अध्यक्ष स्वारगेट आगार व्यवस्थापक शैलेंद्र जगताप साहेब यांच्या हस्ते मोडक यांचा पुणेरी पगडी, शाल ,श्रीफळ, सन्मानचिन्ह, देऊन सन्मान करण्यात आला याच कार्यक्रमात स्वारगेट आगारात कार्यरत असलेले वाहक तानाजी कांबळे यांना शिव-भिम राज्यस्तरीय समाज रत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा कामगारांमार्फत जगताप साहेब यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला यावेळी कामगारांना मार्गदर्शन करत असताना कोणत्याही संस्थेत काम करत असताना संस्था आपली कर्मभूमी म्हणून सर्वांनी एकजुटीने काम केल्यास संस्थेचा नावलौकिक वाढवून आपली प्रगती होत असते संस्थेची भरभराटी हाच आपला विकास असतो व त्यातून जनतेला सुरक्षित अशी सेवा मिळत असते एकत्रितपणे काम केल्यास यश नक्कीच मिळते कार्यक्रमाचे प्रास्ताविक तानाजी कांबळे यांनी केले सूत्रसंचालन सागर कांबळे , आभार बाळासाहेब पायगुडे यांनी मानले या कार्यक्रमासाठी सर्व चालक वाहक अधिकारी,इतर कर्मचारी, निवृत्त कामगार , नातेवाईक मित्रमंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एअरटेलकडून ग्राहकांना 'मिर्झापूर: द मूव्ही'च्या प्रीमियरची खास संधी

पुणे (आरंभ पर्व) : एअरटेलने आपल्या पोस्टपेड अॅडव्हांटेज क्लब अंतर्गत 'मिर्झापूर: द मूव्ही'च्या खास प्रीमियर अनुभवासाठी नोंदणी सुरू केली आहे. मुंबई, चंदीगड आणि लखनऊ येथील एअरटेल पोस्टपेड ग्राहक एअरटेल अॅपद्वारे नोंदणी करून चित्रपटाच्या प्रीमियरला उपस्थित राहण्याची संधी मिळवू शकतात. नोंदणी 2 सप्टेंबर 2026 पर्यंत सुरू राहणार आहे. मोबाइल कनेक्टिव्हिटीच्या नियमित फायद्यांपलीकडे जाऊन आपल्या पोस्टपेड ग्राहकांना मनोरंजनाचे खास अनुभव आणि प्रत्यक्ष कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्याच्या संधी देण्याच्या एअरटेलच्या प्रयत्नांचा हा एक भाग आहे. पात्र ग्राहक एअरटेल अॅप उघडून पोस्टपेड अॅडव्हांटेज क्लब विभाग किंवा 'मिर्झापूर: द मूव्ही'चे प्रमोशनल बॅनर शोधू शकतात. त्यानंतर स्क्रीनवर दिलेल्या सूचनांचे पालन करून नोंदणी पूर्ण करता येईल. एअरटेल पोस्टपेड अॅडव्हांटेज क्लब हा ग्राहकांशी जोडले जाण्यासाठीचा एक उपक्रम आहे. याअंतर्गत पात्र पोस्टपेड ग्राहकांना मनोरंजन, क्रीडा आणि विविध लाइव्ह इव्हेंट्समधील निवडक अनुभवांसाठी नोंदणी करता येते. या संधी शहर, मोहीम आणि उपलब्धतेनुसार वेगवेगळ्या असू शकतात. सामान्यतः नोंदणी एअरटेल अॅपद्वारे केली जाते. प्रत्येक अनुभवासाठी प्रवेश मर्यादित असू शकतो आणि त्यासाठी निवड प्रक्रिया तसेच लागू असलेल्या अटी व शर्ती असू शकतात. 'मिर्झापूर: द मूव्ही'च्या या प्रमोशनसाठी नोंदणी केल्याने प्रीमियरमध्ये प्रवेश निश्चित होत नाही. निवड झालेल्या सहभागींना कार्यक्रमाचे ठिकाण, वेळ आणि इतर लागू अटींबाबतची माहिती स्वतंत्रपणे दिली जाण्याची अपेक्षा आहे. ही संधी केवळ पात्र शहरांपुरती मर्यादित असून एअरटेलच्या अटी व शर्ती आणि निवड प्रक्रियेच्या अधीन आहे.

## पुण्यातील रिअल इस्टेट ब्रँड जमतानीचा ब्रँड अॅम्बेसेडर रणवीर सिंग



पुणे (आरंभ पर्व) : पुण्यातील रिअल इस्टेट क्षेत्रातील जमतानी समूहाने लोकप्रिय अभिनेता रणवीर सिंग याची ब्रँड अॅम्बेसेडर म्हणून नियुक्ती केली आहे. 'The Name is a Promise – नाव म्हणजे एक वचन' या तत्त्वज्ञानावर उभ्या असलेल्या जमतानीच्या नव्या पर्वाची सुरुवात या भागीदारीतून करण्यात आली. पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत या भागीदारीची अधिकृत घोषणा करण्यात आली. गेल्या १६ वर्षांतील जमतानीच्या प्रवासात वेळेत प्रकल्प पूर्ण करणे, दर्जेदार बांधकाम, विश्वासार्हता आणि ग्राहकांशी दीर्घकालीन संबंध या मूल्यांना महत्त्व देण्यात आले आहे. या मूल्यांमुळे पुण्यातील १३ हजारांहून अधिक ग्राहकांचा विश्वास संपादन केल्याचा कंपनीचा दावा आहे. रणवीर सिंगची ऊर्जा, महत्त्वाकांक्षा, सातत्याने स्वतःमध्ये बदल घडवून आणण्याची वृत्ती आणि पारंपरिक चौकटी मोडून नवे प्रयोग करण्याची शैली जमतानीच्या नव्या वाटचालीशी सुसंगत असल्याचे कंपनीने म्हटले आहे. या भागीदारीबद्दल बोलताना रणवीर सिंग म्हणाला, "कोणतीही मजबूत भागीदारी समान मूल्ये आणि भविष्यासाठीच्या समान दृष्टिकोनातून निर्माण होते. जमतानीसोबतची ही भागीदारी माझ्यासाठी त्यामुळेच विशेष आहे. दर्जा आणि विश्वासाच्या जोरावर या ब्रँडने एक मजबूत वारसा निर्माण केला आहे आणि त्याच्या पुढील प्रवासाचा भाग होताना मला अभिमान वाटतो."

## बार्टीच्या संशोधक विद्यार्थ्यांचे आंदोलन



मुंबई (आरंभ पर्व) : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (बार्टी) फेलोशिपधारक अनुसूचित जातीच्या संशोधक विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा आज १४ वा दिवस आहे. या आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी तीव्र आंदोलन छेडले असून, आमरण उपोषणाचा आज नववा दिवस आहे. या पार्श्वभूमीवर एक मोठी आणि महत्त्वाची घडामोड समोर आली आहे. आज आंदोलनाच्या १४ व्या दिवशी राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांच्या शासकीय निवासस्थानी आंदोलकांचे प्रतिनिधी तसेच आंबेडकराईट स्टुडंट असोसिएशनचे राहुल डंबाळे आणि राहुल नागटिळक यांच्यात एक महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. या बैठकीत मंत्री संजय शिरसाठ यांनी आंदोलकांच्या मागण्यांविषयी सरकार सकारात्मक असल्याचे स्पष्ट केले. तसेच २०२३ च्या विद्यार्थ्यांच्या मागण्या मंजूर करत असल्याचे सांगत, सर्वंकष समान धोरणामुळे २०२४ व २०२५ च्या विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर स्वतः मुख्यमंत्री यांच्याशी सविस्तर चर्चा करणार असल्याचे आश्वासन दिले. दरम्यान, या बैठकीत मंत्री शिरसाठ यांनी आमरण उपोषणास बसलेल्या व संशोधक सुरेखा वासनिक व किरण देवकरे यांच्यासोबत थेट संवाद साधला.

# आ. तापकीर यांचा वाढदिवसाचा आनंद विशेष मुलांसोबत

### धान्यतुलेतून माणुसकीचा संदेश | मंडलाध्यक्ष यशवंत लायगुडे यांनी केले आयोजन



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

वाढदिवस म्हटला की शुभेच्छा, सत्कार आणि जल्लोष... मात्र, समाजातील विशेष मुलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवून त्यांच्यासोबत आनंदाचे क्षण साजरे करण्याचा निर्णय घेत आमदार भीमराव तापकीर यांच्या वाढदिवसानिमित्त एक वेगळा आदर्श घालून देण्यात आला.

खडकवासला विधानसभा मतदारसंघातील वडगाव–धायरी–नऱ्हे–माणिकबाग मंडलाच्या वतीने मंडलाध्यक्ष श्री. यशवंत लायगुडे यांच्या पुढाकारातून धायरी येथील रायकर मळा परिसरातील ज्ञानगंगोत्री प्रतिष्ठान संचलित ज्ञानगंगोत्री मतिमंद मुलांची निवासी शाळेत धान्यतुला कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी आमदार भीमराव तापकीर उपस्थित होते. "वाढदिवस हा केवळ शुभेच्छा स्वीकारण्याचा दिवस नसून, समाजातील गरजू घटकांसाठी काहीतरी करण्याची संधी आहे. विशेष मुलांसोबत वेळ घालवून त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवता आले, यापेक्षा मोठे समाधान दुसरे नाही. या मुलांच्या गरजा लक्षात घेऊन त्यांना मदतीचा हात देणे, हीच खरी सामाजिक बांधिलकी आहे," असे मत आमदार भीमराव तापकीर यांनी व्यक्त केले.

विशेष मुलांसोबत काही क्षण संवाद साधताना त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले हास्य आणि आनंदाचे भाव उपस्थितांच्या मनाला स्पर्शून गेले. वाढदिवसाच्या निमित्ताने या मुलांच्या गरजांसाठी योगदान देण्याचा हा उपक्रम केवळ मदतीपुरता मर्यादित न राहता, समाजातील प्रत्येक घटकाप्रती असलेली आपली जबाबदारी अधोरेखित करणारा ठरला. कार्यक्रमास स्थायी समिती सदस्य, नगरसेविका सौ. जयश्री भूमकर, प्रभाग समिती अध्यक्ष नगरसेवक श्री. सचिन मोरे, नगरसेविका सौ. ज्योती गोसावी, नगरसेविका सौ. कोमल नवले, मंडल अध्यक्ष श्री. यशवंत लायगुडे, प्रभाग अध्यक्ष श्री. राजू कुटे, श्री. सारंग नवले, श्री. सुशांत कुटे, श्री. तुषार पोकळे, पै. तुषार पोकळे, श्री. सचिन मणेरे, श्री. शहाजी वांजळे, श्री. सुमित बेनकर, श्री. गणेश पोकळे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच वसतिगृह व्यवस्थापन समिती अध्यक्ष सौ. भावना कसबे, उपाध्यक्ष श्री. प्रविण पाटील, सचिव सौ. आशा सूर्यवंशी, कर्मचारी सदस्य श्री. अनिल कसबे, श्री. तुकाराम कदम, श्री. मंगेश कुंभार, श्री. रवि रणदिवे, श्रीमती रंजना बुरसे यांचीही उपस्थिती होती. वाढदिवसाच्या शुभेच्छांपेक्षा एखाद्याच्या आयुष्यात आनंदाचा क्षण निर्माण करणे अधिक मोलाचे असते अशी प्रतिक्रिया यावेळी आयोजक यशवंत लायगुडे यांनी व्यक्त केली.



## AM/NS इंडिया आणि ICAR-IARI चा संयुक्त पुढाकार

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडिया (AM/NS इंडिया) आणि भारतीय कृषी संशोधन परिषद – भारतीय कृषी संशोधन संस्था (ICAR-IARI) यांनी आज शेतीमध्ये लोह खनिज प्रक्रिया टाकाऊ घटकांच्या (IOTs) शाश्वत वापराबाबत प्रगत संशोधन करण्यासाठी सामंजस्य करारावर (MoU) स्वाक्षरी केली, भारतामध्ये चक्राकार अर्थव्यवस्था आणि साधनसंपत्तीच्या संरक्षणाच्या दृष्टीने हे एक महत्त्वाचे पाऊल ठरले आहे. या सामंजस्य करारावर (MoU) AM/NS इंडियाचे संशोधन आणि विकास प्रमुख डॉ. विश्वनाथन एन. आणि ICAR-IARI चे सहसंचालक (संशोधन) डॉ. सी. विश्वनाथन यांनी स्वाक्षरी करून अदलाबदल केली, याप्रसंगी ICAR-IARI चे प्रमुख शास्त्रज्ञ आणि मुख्य संशोधक डॉ. भूपिंदर सिंग आणि दोन्ही संस्थांचे इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. हे सहकार्य 2024 मध्ये AM/NS इंडिया आणि ICAR-IARI यांच्यात शेतीमध्ये लोह खनिज प्रक्रिया टाकाऊ घटकांच्या योग्यतेचा शोध घेण्यासाठी सुरू झालेल्या उत्साहवर्धक प्राथमिक अभ्यासावर आधारित आहे, कारण लोह खनिजाच्या शुद्धीकरणादरम्यान तयार होणाऱ्या या लोह खनिज प्रक्रिया टाकाऊ घटकांमध्ये सिलिका, आयर्न ऑक्साईड, अॅल्युमिना, कॅल्शियम आणि मॅग्नेशियम यांसारखी नैसर्गिक खनिजे आणि इतर सूक्ष्म व उपयुक्त पोषक तत्त्वे आढळली होती.

## घरगुती अन्नावरील २६ टक्के कुत्र्यांना पचनाच्या तक्रारी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

घरगुती अन्नावर अवलंबून असणाऱ्या कुत्र्यांपैकी २६ टक्के कुत्र्यांना पचनाशी संबंधित समस्या जाणवत असल्याचे एका अंतर्गत अभ्यासातून समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर 'मार्स पेट न्यूट्रिशन'चा ब्रँड असलेल्या आणि भारतातील आघाडीच्या डॉग फूड ब्रँडपैकी एक असलेल्या 'पेडिग्री'ने प्रौढ कुत्र्यांसाठी 'हेल्दी बेली' हे नवीन, संपूर्ण आणि संतुलित खाद्य बाजारात आणले आहे.




भोपळा, रताळे, चिकन, अंडे, प्रीबायोटिक्स आणि तंतू यांच्या मिश्रणातून हे खाद्य तयार करण्यात आले आहे. पचनास अनुकूल घटक, सहज पचणारी प्रथिने आणि आतड्यांच्या आरोग्यास उपयुक्त प्रीबायोटिक्स यांचा समावेश असलेले हे उत्पादन कुत्र्यांची पचनक्रिया सुरळीत ठेवण्यास मदत करते, असा कंपनीचा दावा आहे. कुत्र्यांच्या आरोग्याबाबत त्यांच्या पालकांमध्ये जागरूकता वाढत आहे. समस्या निर्माण झाल्यानंतर उपाय करण्याऐवजी, दैनंदिन आहारातून विशिष्ट आरोग्यविषयक गरजा पूर्ण करण्याकडे अनेकांचा कल वाढत असल्याचे कंपनीने नमूद केले. कंपनीच्या अंतर्गत अभ्यासानुसार, घरचे अन्न देणाऱ्या कुत्र्यांच्या पालकांपैकी २६ टक्के जणांनी त्यांच्या कुत्र्यांना पचनाशी संबंधित समस्या जाणवल्याचे सांगितले.

# गरीब-गरजूंसाठी आरोग्याचा आधार!

### साळुंखे विहार सोसायटी वडगाव बु. मोफत आरोग्य शिबिर संपन्न

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गरीब व गरजू नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने साळुंखे विहार सोसायटी वडगाव बु. येथे मोफत आरोग्य तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. मधली तालीम ट्रस्ट सदस्य व पदाधिकारी यांच्या पुढाकारातून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

मधली तालीम ट्रस्ट यांच्या माध्यमातून आयोजित या आरोग्य शिबिरात विविध आजारांची तपासणी करून नागरिकांना तज्ज्ञ डॉक्टरांकडून मार्गदर्शन करण्यात आले. शिबिरामध्ये नेत्रतपासणी व अल्पदरात चष्मा, दंतआरोग्य तपासणी, ४५ वर्षांवरील नागरिकांची रक्तशर्करा तपासणी, ब्लडप्रेशर, सांधेदुखी व पोटाच्या विकारांची तपासणी तसेच कान-नाक-घसा तपासणी करण्यात आल्या. या शिबिरासाठी जनरल फिजिशियन, नेत्रतज्ज्ञ, कान-नाक-घसा तज्ज्ञ, दंततज्ज्ञ तसेच योग व निसर्गोपचार तज्ज्ञ उपस्थित राहून नागरिकांना आवश्यक मार्गदर्शन केले. सामाजिक बांधिलकी जपत समाजातील सर्वसामान्य व गरजू नागरिकांना आरोग्यसेवेचा लाभ मिळावा, या उद्देशाने सामाजिक कार्यकर्ते रमेशबापू गायकवाड यांनी या आरोग्य शिबिराच्या आयोजनासाठी विशेष पुढाकार घेतला होता.परिसरातील नागरिकांनी या उपक्रमाचा मोठ्या संख्येने लाभ घेतला. यावेळी विजय मते, अनिल मते सोसायटी अध्यक्ष टी.टी.आव्हाड, तसेच सोसायटी चे सदस्य उपस्थित होते.







## आ. तापकीर यांच्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रम

### मानाजीनगरमध्ये नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्री. भीमराव तापकीर यांच्या वाढदिवसानिमित्त मानाजीनगर, नऱ्हे येथे विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

यामध्ये मोफत वृक्षवाटप, N.C.M.C. कार्ड वाटप तसेच रिक्षाचालक बांधवांसाठी CNG कूपन वाटप करण्यात आले. या उपक्रमाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग घेतला. भाजपा पुणे शहर महिला आघाडीच्या सरचिटणीस सौ. कोमल सुशांत कुटे व माजी उपसरपंच श्री. सुशांत कुटे यांच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पर्यावरण संवर्धनासोबतच नागरिकांना आरोग्य सुविधा आणि रिक्षाचालक बांधवांना मदतीचा हात देण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला. यावेळी प्रभाग समिती अध्यक्ष तथा नगरसेवक श्री. सचिन मोरे, नगरसेविका सौ. कोमल नवले, मंडल अध्यक्ष श्री. यशवंत लायगुडे, मंडल अध्यक्ष श्री. गणेश वरपे, प्रभाग अध्यक्ष श्री. राजू कुटे, श्री. सारंग नवले, पै. तुषार पोकळे, श्री. सचिन मणेरे, श्री. शहाजी वांजळे, दिलीप घोडणदिकर, अनिकेत पासलकर, ओंकार कविटकर, अभिषेक पार्टे, प्रथमेश हंगीरकर, सोहम लहाने, आबा निवंगूने, शंकर पवार यांच्यासह भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

"वाढदिवसाचे कार्यक्रम केवळ शुभेच्छा आणि सत्कारापुरते मर्यादित न राहता समाजाच्या उपयोगी पडणारे असावेत. नागरिकांसाठी असे उपक्रम राबविल्याबद्दल कोमल कुटे व सुशांत कुटे यांचे मनःपूर्वक आभार," असे आमदार भीमराव तापकीर यांनी सांगितले. वाढदिवसाचा आनंद उत्सवातून नव्हे, तर समाजोपयोगी कार्यातून इतरांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्यात आहे, हे या उपक्रमातून सिद्ध झाले.

## ध्वनीची मर्यादा पाळू; पण बंदी घालून उपासमारीची वेळ आणू नका

- पुणे जिल्हा साऊंड, लाईट, जनरेटर ओनर्स असोसिएशनची मागणी; सर्व सण-उत्सवांसाठी वर्षभर एकच नियम लागू करा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

दहीहंडी, गणेशोत्सव आणि डीजे हा विषय सध्या तापलेला आहे. अशातच 'आम्ही प्रशासनाने घातलेले सगळे नियम पाळायला तयार आहोत; पण साउंड सिस्टीमवर बंदी घालून किंवा निर्बंध लादून आमच्यावर उपासमारीची वेळ आणू नका', असे आवाहन पुणे जिल्हा साऊंड, लाईट, जनरेटर ओनर्स असोसिएशनने केले आहे. नवी पेठेतील पत्रकार भवन येथे घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत असोसिएशनचे अध्यक्ष गणेश काळभोर, उपाध्यक्ष सागर सुतार, कार्याध्यक्ष ओंकार पडवळ, सल्लागार मोहित पालेशा आणि रिपब्लिकन परिवर्तन पँथरचे गजेंद्र प्रकाश मोरे उपस्थित होते. साऊंड सिस्टीमवर पूर्णपणे बंदी न घालता शासनाने निश्चित केलेल्या ध्वनीमर्यादा, वेळेचे नियम व न्यायालयीन मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करुन गणेशोत्सव साजरा करण्यास परवानगी द्यावी, तसेच एक नियमावली तयार करून ती वर्षभर सर्व सण, उत्सव, कार्यक्रमासाठी लागू करावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. आम्ही यावर्षी अशाच मंडळांकडून बुकिंग घेतले आहे, ज्यांनी आवाज वाढवायला सांगणार नाही, असे लेखी दिले आहे. मात्र दहीहंडीपर्यंत आमच्याविरोधात जाणारे नियम लागू केले, तर मात्र आम्हाला महाराष्ट्रभरातून मोर्चा काढावा लागेल, असा इशाराही असोसिएशनच्या वतीने देण्यात आला.

# वारजे प्रभागात शिव वाहतूक सेनेच्या शाखेचे उद्घाटन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे वाहतूक सेनेच्या वारजे प्रभागातील शाखेचा उद्घाटन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. पुणे शहर प्रमुख वसंत तात्या मोरे आणि संपर्क प्रमुख गजाननजी थरकुडे यांच्या शुभहस्ते शाखेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

शिवसेना ही तळागाळातील जनतेशी जोडलेली संघटना असून, सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवून काम करत राहण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. नव्या शाखेच्या माध्यमातून




वाहतूक क्षेत्रातील बांधवांच्या अडचणी, नागरिकांचे प्रश्न आणि स्थानिक जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचा संकल्प करण्यात आला. खडकवासला विधानसभा प्रमुख शिवाजीराव मते पाटील यांनी शाखेच्या उद्घाटनानिमित्त सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच वाहतूक सेना शहरप्रमुख सचिनजी काटे यांच्या सौजन्याने या शाखेची उभारणी करण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले.

याप्रसंगी तालुकाप्रमुख तानाजी पवळे, युवा सेना जिल्हाप्रमुख बाळकृष्ण वांजळे पाटील, जिल्हा समन्वयक रवींद्रजी मुजुमले, वाहतूक सेना तालुकाप्रमुख अब्दुलजी चव्हाण, माजी नगरसेवक नंदकुमार घाटे, शिवसेना विभागप्रमुख मयूरजी वांजळे, ज्येष्ठ शिवसैनिक व शिवसेना भवन कार्यालयप्रमुख मुकुंदजी पेटकर, जिल्हा संघटक गणपत बुवा खाटपे, ज्येष्ठ शिवसैनिक मनीष भाऊ बराटे, जगदीश भाऊ दिघे, वाहतूक सेना जिल्हाध्यक्ष दत्तात्रय घुले, उपविभागप्रमुख अविनाश सरोदे, तंटामुक्ती अध्यक्ष राजाभाऊ वांजळे, युवा सेना संघटक निखिलजी जावळकर यांच्यासह शिवा भाऊ शिर्के, सिद्धार्थ पोकळे, बाळासाहेब मंडलिक, नितीनजी भामे, आकाशजी यादव, प्रवीणजी बाफना, कौस्तुभ उदास, अजय भाऊ गोड आणि त्यांचे मित्रपरिवार उपस्थित होते. निष्ठावंत शिवसैनिक, पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या जल्लोषात शाखेचे उद्घाटन करण्यात आले. संपर्क प्रमुख गजाननजी थरकुडे यांच्या मार्गदर्शनाने कार्यक्रम यशस्वी झाला. यावेळी युवा सेना जिल्हाप्रमुख बाळकृष्ण वांजळे पाटील आणि वाहतूक सेना शहरप्रमुख सचिनजी काटे यांनी आभार मानले.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
गुरुवार, दि. ०३ सप्टेंबर २०२६





## थोडक्यात पण महत्वाचे



### वाढदिवसानिमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबिर

- मानाजीनगर, नऱ्हे येथे नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

पुणे (आरंभ पर्व) : आमदार भीमराव तापकीर यांच्या वाढदिवसानिमित्त समर्थ युवा फाउंडेशन यांच्या सहकार्याने मानाजीनगर, नऱ्हे येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचा नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला. या उपक्रमाचे आयोजन, प्रभाग अध्यक्ष राजू कुटे भाजपा महिला मोर्चा, शहर उपाध्यक्षा सौ. कोमल सतीश कुटे यांनी केले होते. वाढदिवसाचा आनंद केवळ स्वतःपुरता मर्यादित न ठेवता समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याचा हा प्रयत्न असल्याचे यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले. यावेळी आमदार भीमराव तापकीर यांच्यासमवेत प्रभाग समिती अध्यक्ष तथा नगरसेवक श्री. सचिन मोरे, नगरसेविका सौ. कोमल नवले, मंडल अध्यक्ष श्री. यशवंत लायगुडे, प्रभाग अध्यक्ष श्री. राजू कुटे, श्री. सारंग नवले, पै. तुषार पोकळे, श्री. सचिन मणेरे, श्री. शहाजी वांजळे, श्री. सतीश कुटे तसेच भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते. "वाढदिवसाचा आनंद समाजोपयोगी उपक्रमातून नागरिकांसोबत साजरा करण्याचा हा प्रयत्न मनाला समाधान देणारा आहे. निरोगी समाजासाठी असे उपक्रम सातत्याने राबविण्याचा संकल्प आहे," असे आमदार भीमराव तापकीर यांनी सांगितले. आरोग्य तपासणी शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना आरोग्यविषयक मार्गदर्शन व तपासणीची सुविधा उपलब्ध झाल्याने उपस्थितांनी आयोजकांचे आभार मानले.

### 'बीपीएल एलेव्हेट २०२६'मध्ये थॅलॅमस व्हेंचर्सचा गौरव

पुणे (आरंभ पर्व) : भारतातील वैद्यकीय उपकरण क्षेत्रातील आघाडीची कंपनी बीपीएल मेडिकल टेक्नॉलॉजीजने आयोजित केलेल्या 'बीपीएल एलेव्हेट २०२६' या वार्षिक सन्मान सोहळ्यात थॅलॅमस व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेडचा गौरव करण्यात आला. महाराष्ट्रातील आरोग्यसेवा पुरवठादारांपर्यंत आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान पोहोचविण्यात दिलेल्या योगदानाची दखल घेत हा सन्मान देण्यात आला. बीपीएल समूहाच्या ५० वर्षांच्या वारशाचा भाग असलेल्या 'बीपीएल मेडिकल टेक्नॉलॉजीज'कडून वितरण भागीदारांच्या योगदानाचा गौरव करण्यासाठी 'बीपीएल एलेव्हेट' हे व्यासपीठ आयोजित केले जाते. 'एकत्रित प्रगती' या संकल्पनेवर आधारित या उपक्रमात व्यावसायिक कामगिरी, ग्राहकांशी दृढ संबंध आणि आरोग्यसेवा वितरण व्यवस्था सक्षम करण्यासाठी योगदान देणाऱ्या भागीदारांचा सन्मान केला जातो. थॅलॅमस व्हेंचर्स ही वैद्यकीय उपकरणांच्या वितरण क्षेत्रात कार्यरत असून, रुग्णालये, दवाखाने आणि विविध आरोग्यसेवा संस्थांना आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्याचे काम करते. कंपनीच्या कार्यात निदान उपकरणे, रुग्ण निरीक्षण प्रणाली, उपचार उपकरणे, शस्त्रक्रियेसाठीची साधने तसेच अतिदक्षता विभाग, ऑपरेशन थिएटर आणि आपत्कालीन विभागांसाठी आवश्यक वैद्यकीय साहित्याचा समावेश आहे.

### 'स्किल टू एम्प्लॉयबिलिटी' उपक्रमातून १०० युवकांना कौशल्य प्रशिक्षण

UJJIVAN
UJJIVAN SMALL FINANCE BANK

पुणे (आरंभ पर्व) : उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेने 'वाय४डी फाउंडेशन'च्या भागीदारीत राबविलेल्या 'स्किल टू एम्प्लॉयबिलिटी' या उपक्रमातून १०० बेरोजगार युवकांना उद्योगाभिमुख कौशल्य प्रशिक्षण देण्यात आले असून, त्यापैकी ८६ युवकांना आतापर्यंत रोजगाराच्या संधी मिळाल्या आहेत. बँकेच्या सामाजिक दायित्वांतर्गत (सीएसआर) राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचा उद्देश युवकांना आवश्यक कौशल्ये देऊन त्यांच्यासाठी शाश्वत रोजगाराच्या संधी निर्माण करणे हा आहे. या उपक्रमांतर्गत प्रशिक्षण पूर्ण केलेल्या युवकांचा त्यांच्या यशाबद्दल सत्कार करण्यात आला. भोर येथील कौशल्य प्रशिक्षण केंद्रात हे प्रशिक्षण देण्यात येत असून, प्रशिक्षणानंतर युवकांना भोर आणि शिरवळ परिसरातील औद्योगिक क्षेत्रातील विविध कंपन्यांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येत आहेत. दोन महिन्यांच्या या प्रशिक्षण कार्यक्रमात मुद्रित सर्किट मंडळ (पीसीबी) जोडणी ऑपरेटर तसेच वाहन उद्योगातील जोडणी ऑपरेटर या पदांसाठी आवश्यक तांत्रिक कौशल्ये विकसित केली जात आहेत. राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाच्या (एनएसडीसी) मान्यताप्राप्त तांत्रिक प्रशिक्षणासोबत प्रत्यक्ष कामाचा अनुभव, कार्यस्थळावरील आवश्यक कौशल्ये आणि संवाद व व्यक्तिमत्त्व विकासासारख्या सॉफ्ट स्किल्सचे प्रशिक्षणही दिले जात आहे.

# आमदार भीमराव तापकीर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम

## मोफत चष्मे वाटप व रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद : दैनिक आरंभपर्व पुणे विशेषांकाचे प्रकाशनही उत्साहात





वाढदिवस विशेषांकाचे प्रकाशन करताना व्यवस्थापकीय संपादक मा. प्रतिक गंगणे, निवासी संपादक लक्ष्मण साबळे, आमदार आ. भिमराव अण्णा तापकीर तसेच दै. आरंभ पर्वच्या संस्थापिका तथा संपादिका सौ. सुरेखा मते

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार मा. श्री. भीमराव तापकीर यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पक्ष खडकवासला विधानसभा मतदारसंघाच्या वतीने आज विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. धनकवडी येथील पूर्ती हॉल येथे हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. आमदार भीमराव तापकीर यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. तपासणीदरम्यान गरजू नागरिकांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाचा परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला. याचबरोबर रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते. सामाजिक बांधिलकी जपत नागरिक, कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी रक्तदान करून या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. रक्तदानातून गरजू रुग्णांना मदत मिळावी आणि समाजामध्ये रक्तदानाबाबत जनजागृती व्हावी, हा या उपक्रमामागील उद्देश होता.

या अभिष्टचिंतन सोहळ्याला राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, वैद्यकीय, प्रशासकीय अधिकारी यांच्यासह सामाजिक विविध क्षेत्रातील मान्यवरांनी व खडकवासला मतदारसंघातील नागरिकांनी उस्फूर्तपणे हजेरी लावत आमदार भीमराव अण्णा तापकीर यांना शुभेच्छा दिल्या.

वाढदिवसाच्या निमित्ताने केवळ शुभेच्छा न देता सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांची सेवा करण्याचा उपक्रम राबविण्यात आल्याने उपस्थितांनी आयोजकांचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी सहकार्य केले.

### दैनिक आरंभपर्व पुणे विशेषांकाचे ही प्रकाशन

खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव तापकिर यांच्या वाढदिवसानिमित्त दैनिक आरंभपर्व ने विशेषांक प्रकाशित केला.होता त्याचे प्रकाशन आमदार भीमराव तापकीर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगरसेवक सचिन मोरे, नगरसेवक हरिदास चरवड,मंडल अध्यक्ष यशवंत लायगुडे, विजय मते, रमेश गायकवाड, अनिल मते, राजू दादा कुटे, तुषार पोकळे, यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.



आ. भिमराव अण्णा तापकीर वाढदिवस विशेषांक प्रसिद्ध करताना सामाजिक कार्यकर्ते रमेशबापू गायकवाड, भाजप मंडल अध्यक्ष विजय मते, जिल्हा उपाध्यक्ष अनिल मते, अशोक मते, ॲड. नरसिंह लगड यांच्यासह दैनिक आरंभपर्व निवासी संपादक लक्ष्मण साबळे



दैनिक आरंभ पर्व विशेष अंक प्रकाशित करताना भाजप मंडल अध्यक्ष यशवंत लायगुडे, सामाजिक कार्यकर्ते तुषार पोकळे श्री राजूदादा कुटे, श्री. भडावळे

## प्रशासनाच्या आश्वासनानंतर राजाभाऊ लायगुडे यांचे ठिय्या आंदोलन मागे



**धायरी (दै. आरंभ पर्व)**

लगड मळा ते सावित्री गार्डन या महत्त्वाच्या डीपी रस्त्याचे काम तातडीने सुरू करावे, या मागणीसाठी नगरसेवक राजाभाऊ लायगुडे यांनी केलेले ठिय्या आंदोलन केलेले आंदोलन प्रशासनाच्या आश्वासनानंतर मागे घेण्यात आले. या प्रश्नासाठी नगरसेवक राजेभाऊ लायगुडे यांनी ठिय्या आंदोलन करून मनपा प्रशासनाचे लक्ष वेधले होते. आता रस्त्याच्या कामाला गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. धायरी परिसरातील नागरिकांना दररोज वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत असून, लाड मळा ते सावित्री गार्डन हा डीपी रस्ता पूर्ण झाल्यास वाहतुकीचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटण्यास मदत होणार आहे.

या मागणीसाठी नगरसेवक राजाभाऊ लायगुडे यांनी महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांची भेट घेऊन रस्त्याच्या कामाला गती देण्याची मागणी केली होती.

त्यानंतर महापालिका अधिकाऱ्यांनी संबंधित रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी केली. रस्त्याच्या कामासाठी आवश्यक आर्थिक तरतूद करण्याबाबतही कार्यवाही सुरू असल्याचे सांगण्यात आले. संबंधित ठराव स्थायी समितीच्या मंजुरीसाठी ठेवण्यात आला असून, त्यानंतर पुढील कार्यवाहीला गती देण्याचे आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आले आहे.

"आयुक्तांच्या शब्दावर विश्वास ठेवून आंदोलन तूर्तास मागे घेतले आहे. मात्र, प्रत्यक्ष काम सुरू होईपर्यंत पाठपुरावा सुरूच राहील," असे राजेभाऊ लायगुडे यांनी सांगितले. त्यांच्या या भूमिकेमुळे धायरीकरांच्या महत्त्वाच्या रस्त्याच्या प्रश्नाला पुन्हा एकदा गती मिळाली आहे.

## द वेल्थ कंपनी म्युच्युअल फंडकडून मल्टी कॅप फंड लाँच

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

पॅन्टोमॅथ ग्रुपचा भाग असलेल्या द वेल्थ कंपनी म्युच्युअल फंडने 'द वेल्थ कंपनी मल्टी कॅप फंड' या नव्या ओपन-एंडेड इक्विटी योजनेची घोषणा केली आहे. दीर्घकालीन भांडवली वृद्धीचे उद्दिष्ट असलेल्या या योजनेत लार्ज कॅप, मिड कॅप आणि स्मॉल कॅप कंपन्यांच्या समभागांमध्ये गुंतवणूक केली जाणार आहे. या फंडाचा न्यू फंड ऑफर (NFO) २७ ऑगस्ट २०२६ रोजी खुला झाला असून १० सप्टेंबर २०२६ रोजी बंद होईल. त्यानंतर २१ सप्टेंबरपासून योजनेत नियमित खरेदी-विक्री व्यवहार सुरू होतील. मल्टी कॅप फंडाच्या नियामक चौकटीअंतर्गत लार्ज, मिड आणि स्मॉल कॅप या तिन्ही विभागांमध्ये प्रत्येकी किमान २५ टक्के गुंतवणूक राखणे आवश्यक असते. द वेल्थ कंपनी मल्टी कॅप फंडमध्ये या तिन्ही विभागांसाठी २५ ते ५० टक्क्यांदरम्यान अपेक्षित गुंतवणूक वाटप ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे बाजारातील परिस्थिती आणि आर्थिक चक्रानुसार विविध मार्केट-कॅप विभागांमध्ये संधी शोधण्याची लवचिकता गुंतवणूक व्यवस्थापन टीमला मिळणार आहे.

# प्रभाग क्र. ३३ मधील पाणी समस्या सुटणार!

जुन्या पाणीवाहिन्या बदलून नवीन मोठ्या क्षमतेची पाणीवाहिनी विकसित करण्यासाठी ₹५.५० कोटींचा निधी मंजूर



**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

प्रभाग क्रमांक ३३ मधील पाणीटंचाई आणि कमी दाबाने होणाऱ्या पाणीपुरवठ्याची समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी महापालिका प्रशासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. जुन्या व जीर्ण झालेल्या पाणीवाहिन्या बदलून नवीन मोठ्या क्षमतेची पाणीवाहिनी विकसित करण्याबाबत प्रशासनाची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या कामासाठी ₹५.५० कोटींचा निधी मंजूर करण्यात आला असून, आवश्यक अंदाजपत्रक तातडीने तयार करून लवकरात लवकर कामाला सुरुवात करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

या निधीतून धायरी, डीएसके, नांदेड, खडकवासला, कोल्हेवाडी, शिवनगर, किरकटवाडी, नांदोशी, सणसवाडी, उत्तमनगर तसेच कोंढवे-धावडे आदी भागांमध्ये नवीन पाणीपुरवठा लाईन विकसित करण्यात येणार आहे. त्यामुळे या परिसरातील नागरिकांना भेडसावणाऱ्या पाणीपुरवठ्याच्या अडचणी दूर होण्यास मदत होणार आहे.

> "प्रभाग क्रमांक ३३ मधील नागरिकांना पुरेसा व सुरळीत पाणीपुरवठा मिळावा, यासाठी जुन्या पाणीवाहिन्या बदलून नवीन मोठ्या क्षमतेची पाणीवाहिनी विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी ₹५.५० कोटींचा निधी मंजूर झाला असून, आवश्यक अंदाजपत्रक तातडीने तयार करून कामाला लवकर सुरुवात करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या कामामुळे नागरिकांची पाणीसमस्या दूर होण्यास मोठी मदत होईल."
> **— मा. मुख्य अभियंता नंदकुमार जगताप**

दरम्यान, प्रभागातील पाणीप्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी प्रशासनासोबत सातत्याने चर्चा करण्यात येत होती. त्याच अनुषंगाने झालेल्या या बैठकीत नगरसेविका धनश्री कोल्हे, नगरसेवक सुभाष नाणेकर तसेच भाजपचे ओबीसी मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश सचिव दत्तात्रय कोल्हे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. यावेळी महेंद्रकर, साठे, रुपेश मते यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांनी पाणीपुरवठा व्यवस्थेचा आढावा घेतला. जुन्या पाणीवाहिन्यांमुळे निर्माण होणाऱ्या अडचणी दूर करून नागरिकांना सुरळीत व पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने या कामाला प्राधान्य देण्यात आले आहे. प्रभागातील नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेल्या पाणीप्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याच्या दिशेने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

## ग्रामपंचायत कानगाव ता. दौंड जि. पुणे

बी-१ पेपर नोटीस क्रमांक -१ सन २०२६-२७

ग्रामपंचायत कानगाव ता.दौंड जि.पुणे यांचेकडून खालील नमूद केलेल्या कामांची निविदा बी १ निविदा पद्धतीने (दोन सिलबंद लिफाफा पद्धतीने) जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निविदेचा नमुना ग्रामपंचायत कानगाव ता.दौंड जि.पुणे यांच्याकडून दिनांक ०३/०९/२०२६ते दिनांक ०९/०९/२०२६ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यंत देण्यात येतील व दिनांक ०३/०९/२०२६ ते दिनांक ०९/०९/२०२६रोजी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यंत पोस्टाने / समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्विकारले जातील. सदर सिलबंद निविदा मासिक सभे दिवशी/ग्रामपंचायत सोईनुसार उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजकीय रक्कम | निविदा विक्री करण्याचा कालावधी | निविदा फी | बायाना रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | भीमराव रोडे घर राजेंद्र घोघरे घर पाणी पुरवठा योजना करणे | ३२०४४१ | ०३/०९/२०२६ ते ०९/०९/२०२६ | २३६/- | सूट |
| २. | जिल्हा परिषद शाळा गावठाण कुंपण करणे | ६,४२,४०५ | ०३/०९/२०२६ ते ०९/०९/२०२६ | २३६/- | सूट |
| ३. | गावांतर्गत गटर लाईन करणे | ९९१७९ | ०३/०९/२०२६ ते ०९/०९/२०२६ | २३६/- | सूट |
| ४. | गावांतर्गत गटर लाईन करणे | १४९४९९ | ०३/०९/२०२६ ते ०९/०९/२०२६ | २३६/- | सूट |
| ५. | भानुदास शिंदे घर ते सोमनाथ गोते घर बंधिस्त गटर | ५०००० | ०३/०९/२०२६ ते ०९/०९/२०२६ | २३६/- | सूट |
| ६. | राम शिंदे घर ते अण्णा धनगर घर बंधिस्त गटर लाईन करणे | २९९०४२ | ०३/०९/२०२६ ते ०९/०९/२०२६ | २३६/- | सूट |
| ७. | ग्रा.प.शौचालय दुरुस्ती करणे | ७५००० | ०३/०९/२०२६ ते ०९/०९/२०२६ | २३६/- | सूट |
| ८. | आंबेडकर नगर येथे एक खोली बांधकाम करणे | ५००००० | ०३/०९/२०२६ ते ०९/०९/२०२६ | २३६/- | सूट |
| ९. | ग्रा.प.शौचालय दुरुस्ती करणे | ११७८९६ | ०३/०९/२०२६ ते ०९/०९/२०२६ | २३६/- | सूट |

**निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :** १) कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. २) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत कानगाव ता.दौंड जि.पुणे ग्रा.प. कार्यालयात रोख भरल्यानंतर उपलब्ध होतील. तसेच निविदा भरणे कमी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. ३) यापूर्वी केलेल्या कामांचे पूर्णत्वाचे दाखले जोडावेत. ४) आपण तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा वेगवेगळा सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघडण्यात येईल आपण सर्व नियमास पात्र झाल्यानंतर आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल.सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्वीकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत कानगाव यांनी राखून ठेवला आहे.

**ग्रामसेवक** **प्रशासक**
**ग्रामपंचायत कानगाव ता.दौंड जि.पुणे**

## थोडक्यात पण महत्वाचे



### भ्रष्टाचाराची चौकशी करण्याची वंचित बहुजन आघाडीची मागणी

- गटविकास अधिकारी अरुण मरभळ यांचे आठ दिवसांत चौकशीचे आदेश

दौंड (आरंभ पर्व) : दौंड तालुक्यातील वडगाव दरेकर ग्रामपंचायतीमध्ये कथित भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत या प्रकरणाची चौकशी करण्यात यावी, या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने दौंड पंचायत समिती कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकारी आणि ग्रामस्थांनी गटविकास अधिकारी अरुण मरभळ यांची भेट घेऊन त्यांना निवेदन सादर केले. ग्रामपंचायतीतील कथित गैरप्रकारांची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. या निवेदनाची दखल घेत गटविकास अधिकारी अरुण मरभळ यांनी आठ दिवसांच्या आत चौकशी करून आवश्यक ती कारवाई करण्याचे आश्वासन दिले. या आंदोलनावेळी वंचित बहुजन आघाडीचे दौंड तालुका अध्यक्ष अक्षय शिखरे, वडगाव दरेकर शाखाध्यक्ष संदीप पोळ यांच्यासह महिला आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### शशी थरूर यांच्या हस्ते प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांचा सन्मान

पुणे (आरंभ पर्व) : सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांना 'ग्लोबल व्हिजनरी एज्युकेशनिस्ट, पेट्रियॉटिक अँड कम्पॅशनेट लीडर' या प्रतिष्ठित सन्मानाने गौरविण्यात आले. नवी दिल्ली येथील आयआयटी दिल्लीच्या रिसर्च अँड इनोव्हेशन पार्कमधील सभागृहात नुकत्याच आयोजित 'इंडिया@२०४७ लीडरशिप, इनोव्हेशन अँड ग्लोबल पॉवर समिट २०२६' मध्ये खासदार आणि संयुक्त राष्ट्रसंघाचे माजी अंडर-सेक्रेटरी-जनरल डॉ. शशी थरूर यांच्या हस्ते हा सन्मान प्रदान करण्यात आला. आजीवन, मूल्याधिष्ठित व सर्वांगीण शिक्षण, चारित्र्यनिर्मिती तसेच विद्यार्थी, माजी विद्यार्थी, कर्मचारी आणि समाजामध्ये देशभक्ती, संवेदनशीलता व शाश्वत मूल्यांची जोपासना करण्यासाठी त्यांनी दिलेल्या महत्त्वपूर्ण आणि दीर्घकालीन योगदानाची दखल घेत हा गौरव करण्यात आला. 'नेतृत्व, नवोन्मेष आणि जागतिक प्रभावाच्या माध्यमातून २०४७ च्या भारताचा प्रवास घडविणे' या संकल्पनेवर आधारित या शिखर परिषदेत विविध क्षेत्रांतील निवडक मान्यवर नेते, नवोन्मेषक, उद्योजक, धोरणकर्ते, शिक्षणतज्ज्ञ, गुंतवणूकदार आणि परिवर्तनाचे शिल्पकार सहभागी झाले होते.

### ट्रिलियन-डॉलर अर्थव्यवस्थेच्या दिशेने आखला विकासाचा रोडमॅप

नवी दिल्ली (आरंभ पर्व) : भारताच्या पायाभूत सुविधा विकासाला आणि उत्पादन क्षेत्राला गती देण्यासाठी बांधकाम उपकरण उद्योगाची भूमिका अधिक महत्त्वाची ठरणार आहे. 'मशीन्स दॅट बिल्ड इंडिया – सीई ॲट द हार्ट ऑफ अ ट्रिलियन-डॉलर इकॉनॉमी' या संकल्पनेखाली इंडियन कन्स्ट्रक्शन इक्विपमेंट मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (आयसीईएमए) चे वार्षिक सत्र २०२६ नवी दिल्लीतील हॉटेल ताज पॅलेस येथे पार पडले. या सत्रात वरिष्ठ सरकारी अधिकारी, धोरणकर्ते आणि उद्योग क्षेत्रातील दिग्गजांनी भारताच्या पायाभूत सुविधांचा विस्तार, देशांतर्गत उत्पादन क्षमता, जागतिक स्पर्धात्मकता आणि विकसित भारत २०४७च्या उद्दिष्टपूर्तीत बांधकाम उपकरण उद्योगाच्या योगदानावर चर्चा केली. केंद्रीय अवजड उद्योग व सार्वजनिक उपक्रम मंत्री एच. डी. कुमारस्वामी, केंद्रीय कोळसा व खाण मंत्री जी. किशन रेड्डी, नीती आयोगाचे सदस्य डॉ. आर. बालसुब्रमण्यम आणि रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव महमूद अहमद यांनी सत्राला संबोधित केले. आयसीईएमएचे अध्यक्ष तसेच जेसीबी इंडियाचे सीईओ व व्यवस्थापकीय संचालक दीपक शेट्टी यांनी उद्योगाच्या वतीने चर्चेचे नेतृत्व केले.

### लिटमॉसने पुण्यात नवीन कार्यालयाचे केले उद्‍घाटन




पुणे (आरंभ पर्व) : जागतिक लर्निंग ॲक्सीलरेशन प्लॅटफॉर्म असलेल्या लिटमॉसने पुण्यात आपले नवीन सुरू करून एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. लिटमॉस एआय युगात १५० देशांमधील ११,००० हून अधिक संस्थांना त्यांचे कार्यबल, भागीदार आणि ग्राहकांमध्ये मानवी क्षमता निर्माण करण्यास मदत करते. हे नवीन स्थान भारतामध्ये एक मजबूत अभियांत्रिकी समुदाय निर्माण करण्याच्या दृष्टीने एक धोरणात्मक गुंतवणूक आहे. ती जगभरातील विद्यमान डेव्हलपर कार्यक्रमाला पूरक असून लिटमॉसच्या जागतिक तंत्रज्ञान क्षमतांचा विस्तार करणारी आहे. लिटमॉसचे मुख्य कार्यकारी अधिकारी एरिक व्हर्मिलियन, लिटमॉसचे सीटीओ ब्रायन सोबस आणि इंडिया ऑपरेशन्सचे संचालक सरबजीत सिंग यांच्या उपस्थितीत फीत कापून या कार्यालयाचे औपचारिक उद्‍घाटन करण्यात आले. लिटमॉसचे मुख्य कार्यकारी अधिकारी एरिक व्हर्मिलियन म्हणाले, "पुण्यातील आमच्या कार्यालयाची सुरुवात ही लिटमॉसच्या लोक, तंत्रज्ञान आणि जागतिक क्षमतांमध्ये सतत गुंतवणूक करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचा टप्पा आहे. भारताकडे जगातील सर्वात सखोल आणि सर्वाधिक कुशल तंत्रज्ञान प्रतिभा आहे.

# खो-खो चॅम्पियनशिपमुळे भारतातील खो-खो क्रांतीला बळ






**पुरी (दै. आरंभ पर्व)**

ओडिशा AM/NS इंडिया खो-खो हाय परफॉर्मन्स सेंटरच्या पुढाकाराने आयोजित ओडिशा AM/NS इंडिया ज्युनिअर खो-खो चॅम्पियनशिप २०२६ नुकतीच उत्साहात पार पडली. ओडिशा सरकारच्या क्रीडा व युवक सेवा विभाग (DSYS), खो-खो फेडरेशन ऑफ इंडिया (KKFI) आणि ओडिशा खो-खो असोसिएशन (OKKA) यांच्या सहकार्याने झालेल्या या तीन दिवसीय स्पर्धेत देशभरातील १२ संघांमधील तब्बल १८० युवा खेळाडूंनी सहभाग घेतला.

२९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून स्पर्धेचे उद्‍घाटन झाले. यावेळी KKFIचे अध्यक्ष सुधांशु मित्तल, KKFIचे उपाध्यक्ष व OKKAचे सचिव प्रद्युम्न मिश्रा, आंध्र प्रदेश खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष एम.व्ही. एस.एस. प्रसाद आणि AM/NS इंडियाचे CSR प्रमुख डॉ. विकास यादवेंदू उपस्थित होते. मुलींच्या गटात महाराष्ट्राचा विजेतेपदावर कब्जा

ज्युनिअर मुलींच्या अंतिम सामन्यात महाराष्ट्राने यजमान ओडिशाचा २४-२० असा चार गुणांनी पराभव करत विजेतेपद पटकावले. कांस्यपदकाच्या लढतीत पंजाबने तमिळनाडूचा पराभव करून तिसरे स्थान मिळवले. ओडिशाच्या तुलसी नाईक हिला बेस्ट अटॅकर, महाराष्ट्राच्या मैथिली पवार हिला बेस्ट डिफेंडर, तर महाराष्ट्राच्या स्नेहा लामकाने हिला 'प्लेअर ऑफ द टूर्नामेंट' पुरस्काराने गौरवण्यात आले. AM/NS इंडियाच्या HR आणि ॲडमिनिस्ट्रेशन विभागाचे संचालक व उपाध्यक्ष आशुतोष तेलंग यांनी विजेत्या तसेच सहभागी खेळाडूंचे अभिनंदन केले. योग्य प्रशिक्षण आणि स्पर्धात्मक संधी उपलब्ध करून दिल्यास खो-खो भारतातील लोकप्रिय खेळांपैकी एक होऊ शकतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. देशभरातील प्रतिभावान खेळाडूंना एकत्र आणून त्यांना स्पर्धेची संधी देण्याचे काम सुरू असून, आगामी आवृत्ती आणखी मोठ्या स्तरावर आयोजित करण्यासाठी AM/NS इंडिया कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

३१ ऑगस्ट रोजी श्री जगन्नाथ संस्कृत विद्यापीठ, पुरीचे कुलगुरू प्रा. प्रभात कुमार मोहपात्रा यांच्या प्रमुख उपस्थितीत स्पर्धेचा समारोप झाला. यावेळी ऑलिम्पियन व अर्जुन पुरस्कार विजेते के. रवी कुमार, बीजू पटनाईक स्पोर्ट्स पुरस्कार विजेत्या व पॅरा ॲथलीट सुचित्रा परिडा, प्रद्युम्न मिश्रा, विकास यादवेंदू, पुरीचे जिल्हा क्रीडा अधिकारी चंदन कुमार साहू आणि जिल्हा माहिती व जनसंपर्क अधिकारी संतोष कुमार सेठी यांच्यासह प्रशिक्षक, अधिकारी व खेळाडू उपस्थित होते.

ओडिशा AM/NS इंडिया खो-खो हाय परफॉर्मन्स सेंटरने अल्पावधीतच प्रतिभावान खेळाडू घडविणारे महत्त्वाचे केंद्र म्हणून ओळख निर्माण केली आहे. या केंद्रातील खेळाडूंनी खो-खो विश्वचषक, राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा आणि खेलो इंडिया यूथ गेम्स यांसारख्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर उल्लेखनीय कामगिरी केली आहे. राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांचे आयोजन आणि सातत्याने पदकविजेते खेळाडू घडविण्याच्या माध्यमातून हे केंद्र भारतीय खो-खोला नवी दिशा देत आहे.

#### मुलांच्या गटात कर्नाटकाचा थरारक विजय

ज्युनिअर मुलांच्या अंतिम सामन्यात कर्नाटकाने महाराष्ट्राचा अवघ्या दोन गुणांनी ३६-३४ असा पराभव करत विजेतेपद मिळवले. अखेरच्या क्षणापर्यंत रंगलेल्या या सामन्याने प्रेक्षकांची उत्सुकता शिगेला पोहोचवली. कांस्यपदकाच्या सामन्यात ओडिशाने कोल्हापूरचा पराभव करत तिसरे स्थान मिळवले. कर्नाटकाच्या इब्राहिम याला बेस्ट अटॅकर, महाराष्ट्राच्या पार्थ देवकाते याला बेस्ट डिफेंडर, तर कर्नाटकाच्या अनिकेत याला 'प्लेअर ऑफ द टूर्नामेंट' पुरस्कार मिळाला.

## डॉ. राजीव हिरवे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ डॉक्टर असोसिएशनची शोकसभा




**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

उरुळी कांचन येथील डॉक्टर असोसिएशनच्या वतीने दिवंगत डॉ. राजीव हिरवे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ शोकसभेचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपस्थित डॉक्टर, सामाजिक कार्यकर्ते आणि ग्रामस्थांनी डॉ. हिरवे यांच्या वैद्यकीय क्षेत्रातील योगदानाला उजाळा देत त्यांच्या आठवणींना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. डॉ. राजीव हिरवे यांनी वैद्यकीय सेवेसोबतच रुग्णांच्या हिताला नेहमीच प्राधान्य दिले. त्यांच्या कार्यामुळे वैद्यकीय क्षेत्रासह सामाजिक क्षेत्रातही त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली होती. त्यांच्या निधनाने वैद्यकीय क्षेत्रासह सामाजिक वर्तुळात निर्माण झालेली पोकळी भरून काढणे कठीण असल्याची भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली. शोकसभेला काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष देविदास भन्साळी, महात्मा गांधी सर्वोदय संघाचे सचिव सोपान कांचन, उरुळी कांचन पतसंस्थेचे सचिव अशोक सावंत, संचालक शिवाजी कांचन, सतीश जाधव, उरुळी कांचन डॉक्टर असोसिएशनचे पदाधिकारी, ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच परिसरातील वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शरद गोते यांनी केले, तर डॉ. गणेश आखाडे यांनी प्रास्ताविक केले. ज्येष्ठ समाजसेवक डॉ. रवींद्र भोळे यांनी पसायदान सादर करून उपस्थितांचे आभार मानले. यावेळी उपस्थितांनी डॉ. राजीव हिरवे यांच्या स्मृतींना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

## फिरत्या ग्रंथालयाचे राजगुरू महाविद्यालयात उत्स्फूर्त स्वागत

**राजगुरूनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**




पुणे पुस्तक महोत्सव, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे तसेच राष्ट्रीय पुस्तक न्यास आणि केंद्रीय शिक्षण मंत्रालय, भारत सरकार यांच्या सौजन्याने आयोजित करण्यात आलेल्या फिरत्या ग्रंथालयाचे हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयात उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. आकर्षक पद्धतीने सजवलेल्या पुस्तकांनी भरलेल्या बसमधील या फिरत्या ग्रंथालयाला विद्यार्थी, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब लिंभोरे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, डॉ. गोपाळ अलापुरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे आणि डॉ. विठ्ठल दौंडकर, राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे सुरेश कुमार, धर्मपाल सिंग, मनोज कुमार, सतीश कुमार, हरिभाऊ आव्हाड यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते. या प्रसंगी बोलताना ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील म्हणाले, महाराष्ट्राला समृद्ध अशी शैक्षणिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक परंपरा लाभली आहे. पुस्तक वाचनाच्या माध्यमातून ही परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांनी या फिरत्या ग्रंथालयाचा अधिकाधिक लाभ घ्यावा.

पुस्तके वाचून जीवन घडवावे, असे सांगितले. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीचा प्रसार करण्याच्या दृष्टीने फिरत्या ग्रंथालयाचा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी असल्याचेही त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होऊन ज्ञानाची व्याप्ती वाढण्यास अशा उपक्रमांचा मोठा हातभार लागेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, डिसेंबरमधील पुस्तक महोत्सव व जानेवारी महिन्यात पुणे येथे होणाऱ्या १००व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे निमंत्रणही संस्थेला व महाविद्यालयाला देण्यात आले. त्यामुळे साहित्यप्रेमी विद्यार्थी आणि प्राध्यापकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

विद्यार्थ्यांनी पुस्तकांनी सजलेल्या फिरत्या ग्रंथालयाची पाहणी करून विविध विषयांवरील पुस्तकांची माहिती घेतली. वाचनसंस्कृतीला चालना देणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी स्वागत केले. आदित्य बोरसे, दिव्या पिंगळे, ज्ञानदा कड, ओम जाधव, अभिषेक कोरडे या विद्यार्थ्यांनी हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी केले.

## पुण्यातून 'डेंग्यूमुक्त भारत' अभियानाला सुरुवात

### ओडोमॉस कडून दिवसा डेंग्यूचा धोका टाळण्यासाठी जनजागृतीला चालना




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील क्रमांक एक वैयक्तिक वापरासाठीचे डास प्रतिबंधक उत्पादन असलेल्या ओडोमॉसने 'डेंग्यूमुक्त भारत' या देशव्यापी जनजागृती अभियानाची सुरुवात केली. नागरिकांमध्ये डेंग्यूपासून बचावाबाबत जागरूकता निर्माण करणे तसेच दिवसा डेंग्यूचा प्रसार करणाऱ्या डासांपासून संरक्षण घेण्याची गरज अधोरेखित करणे, हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

शाळांमधील जनजागृती कार्यक्रम आणि समुदाय सहभागाच्या उपक्रमांद्वारे पावसाळ्याच्या काळात दररोज डासांपासून संरक्षण घेण्या बाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न या अभियानातून केला जाणार आहे. डासांमुळे पसरणाऱ्या आजारांपासून बचावाबाबत जनजागृती निर्माण करणे आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना अंगीकारण्यास प्रोत्साहन देणे, हा ओडोमॉसच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा एक भाग आहे. ग्राहक शिक्षण आणि समुदाय जनजागृती कार्यक्रमांद्वारे कुटुंबांना डेंग्यू, मलेरिया आणि इतर डासांमुळे पसरणाऱ्या आजारांचा प्रसार करणाऱ्या डासांपासून सुरक्षित राहण्यास मदत करण्याचे उद्दिष्ट ब्रँडने ठेवले आहे.

या अभियानांतर्गत संपूर्ण भारतातील शाळांमध्ये विविध उपक्रम राबवले जाणार असून, जनजागृती सत्रांच्या माध्यमातून विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांशी संवाद साधला जाणार आहे.

डेंग्यूचा प्रसार करणाऱ्या डासांपासून प्रभावी संरक्षण कसे मिळवावे, याबाबत त्यांना माहिती देण्यात येणार आहे. या उपक्रमाचा शुभारंभ पुण्यात करण्यात आला.

## किरकोळ कारणावरून पत्नीचा खून; मुलावरही चाकूने वार

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

माझ्या बहिणीशी का बोलत नाही, या किरकोळ कारणावरून झालेल्या भांडणातून पत्नीचा गळा आवळून खून केला, तसेच घटना पाहणाऱ्या स्वतःच्या मुलाचाही चाकूने वार करून खून करण्याचा प्रयत्न केला. हि घटना रविवारी (दि. ३०) रात्रीच्या सुमारास येथील वाडा रस्ता परिसरात घडली. दिपा महेंद्र दौंडकर (वय ४०) असे या घटनेतील मृत महिलेचे नाव असून संशयीत आरोपी महेंद्र शिवाजी दौंडकर (वय ४५, रा. संगम गार्डन, वाडा रस्ता, राजगुरुनगर, मूळ रा. कनेरसर, ता. खेड) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत खेड पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुलगा अथर्व महेंद्र दौंडकर (वय १७ ) याने याप्रकरणी फिर्याद दिली आहे , रविवारी (दि. ३०) रात्री साडेनऊ ते साडेअकरा वाजण्याच्या दरम्यान राहत्या घरी ही घटना घडली. आरोपी महेंद्र दौंडकर याने पत्नी दिपा या आपल्या बहिणीशी बोलत नसल्याच्या रागातून झालेल्या भांडणातूनत्यांचा गळा आवळून खून केला. आईला उठवण्यासाठी मुलगा बेडरूममध्ये गेला असता हा प्रकार उघडकीस आला. त्यावेळी आरोपीने मुलाचाही ओढणीने गळफास देऊन खून करण्याचा प्रयत्न केला. मुलाने आरडाओरड करत घराबाहेर पळण्याचा प्रयत्न केला असता, आरोपीने 'तुला चाकू घुपसुन मारून टाकेन' अशी धमकी देत त्याच्या उजव्या हाताच्या अंगठ्यावर चाकूने वार केला.

# ड्रीमेचा एच१२ ड्युअल फ्लेक्सरीच भारतात दाखल




**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

स्मार्ट होम तंत्रज्ञान क्षेत्रातील ड्रीमे टेक्नॉलॉजीने भारतात एच१२ ड्युअल फ्लेक्सरीच वेट अँड ड्राय व्हॅक्यूम सादर केला आहे. ६-इन-१ स्वच्छता क्षमता, २३,००० पास्कलचे शक्तिशाली सक्शन आणि १८० अंशांपर्यंत लाय-फ्लॅट डिझाइन यामुळे हे उपकरण घरातील विविध प्रकारच्या स्वच्छतेसाठी उपयुक्त ठरणार आहे. हे उपकरण १ सप्टेंबरपासून ४४,९९९ रुपये किमतीत ॲमेझॉन, ड्रीमे इंडियाची अधिकृत वेबसाइट, क्रोमा तसेच निवडक रिटेल स्टोअर्समध्ये उपलब्ध झाले आहे. एच१२ ड्युअल फ्लेक्सरीचच्या ६-इन-१ क्षमतेमुळे फरशी धुणे आणि व्हॅक्यूम करणे यासोबतच कार्पेट, सोफा, पडदे, कीबोर्ड तसेच कारचे आतील भाग स्वच्छ करता येतात. १८० अंशांपर्यंत पूर्णपणे सपाट होणाऱ्या डिझाइनमुळे पलंग, सोफा आणि कमी उंचीच्या फर्निचरखालील भागही सहज स्वच्छ करता येतात.

### ६-इन-१ स्वच्छतेसह २३ हजार Pa सक्शन

उपकरणात २३,००० Pa सक्शन पॉवर देण्यात आली असून, धूळ-कचऱ्यासोबत अन्नाचे कण, कॉफीचे दाणे, सांडलेले पदार्थ आणि स्वयंपाकघरातील तेलकटपणाही साफ करण्यासाठी ते तयार करण्यात आले आहे. टँगलकट रेझिलिएंट स्क्रॅपर केसांचा गुंता कमी करण्यास मदत करते.

बॅटरी काढता येण्याजोगी असून फ्लोअर-वॉशिंग मोडमध्ये ५० मिनिटांपर्यंत, तर व्हॅक्यूम मोडमध्ये ६० मिनिटांपर्यंत रनटाइम मिळतो. तसेच, ९०°C हॉट-वॉश सेल्फ-क्लीनिंग प्रणाली ब्रशवरील ग्रीस आणि हट्टी अवशेष काढण्यास मदत करते. त्यानंतर गरम हवेच्या माध्यमातून ब्रश वाळवण्याची सुविधाही देण्यात आली आहे.

उपकरणातील एअरगार्ड मल्टी-कोन टेक्नॉलॉजी ०.३ मायक्रोमीटर आकाराच्या ९९.९५ टक्के कणांना पकडण्यासाठी तयार करण्यात आली आहे. याशिवाय पॉवरअलाइन ग्रिपमुळे हाताळणी अधिक आरामदायक करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. पांढऱ्या एलईडी प्रकाशासह मल्टी-सरफेस ब्रशमुळे फरशीवरील बारीक धूळ आणि कचरा ओळखणे सोपे होते.

ड्रीमे टेक्नॉलॉजी इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक मनू शर्मा यांनी सांगितले की, भारतीय कुटुंबांच्या बदलत्या स्वच्छता गरजा लक्षात घेऊन अधिक लवचिक, सोयीस्कर आणि बुद्धिमान स्वच्छता उपाय देण्याच्या उद्देशाने एच१२ ड्युअल फ्लेक्सरीच सादर करण्यात आला आहे.

एच१२ ड्युअल फ्लेक्सरीचला एक वर्षाची वॉरंटी देण्यात आली असून, भारतातील १६० हून अधिक शहरांमध्ये ड्रीमेचे विक्रीनंतरचे सेवा नेटवर्क उपलब्ध आहे. पात्र ठिकाणी पिक-अप व ड्रॉप आणि इन्स्टॉलेशन सपोर्टसारख्या सुविधा ग्राहकांना मिळणार आहेत.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.